# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३

## (सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेच्या सूचना) (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

**(१) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील शेतकऱ्यांवर यावर्षी एकामागून एक संकटे येणे, सुरूवातीला अतिवृष्टी, नंतर दुष्काळ आणि गारपिटीसह आलेल्या अवकाळी पावसाने शेतकरी पूर्णत: उद्ध्वस्त होणे, ७५% पेक्षा अधिक भागात भीषण दुष्काळी परिस्थिती असताना दुष्काळ जाहीर करण्यात शासनाकडून अक्षम्य विलंब होणे, आतापर्यंत १०२१ महसूली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित केली तरी अद्याप अनेक दुष्काळी तालुक्यांचा समावेश झालेला नसणे, विमा कंपन्यांच्या दबावापोटी व त्यांना आर्थिक लाभ करून दिल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणे, जाहिराती, "शासन आपल्या दारी" सारखे कार्यक्रम, ठेकेदारांची गौणखनिज रॉयल्टी माफी, बियरवरील उत्पादन शुल्क माफी यासाठी तत्परतेने निर्णय घेणारे सरकार सरसकट दुष्काळ जाहीर करण्यात हात आखडता घेत असणे, अतिवृष्टी व दुष्काळाच्या प्रस्तावांबाबत केंद्राची कोणतीही हालचाल दिसत नसल्यामुळे केंद्राकडून शेतकऱ्यांना भरीव मदत मिळण्याची आशा नसणे, त्यामुळे कितीही आर्थिक भार पडला व कर्ज झाले तरी शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी राज्य शासनाने सरसकट दुष्काळ जाहीर करून राज्याच्या तिजोरीतून मदत करण्याची होत असलेली मागणी, तथापि, शासनाची इच्छाशक्ती नसणे, दुष्काळी उपाययोजना, शेतकऱ्यांना तातडीची मदत, तसेच नैसर्गिक आपत्तीबरोबरच केंद्र व राज्य सरकारने अनेक समस्या शेतकऱ्यांसमोर उभ्या केल्या असणे, दीड वर्षात सर्वाधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, शेतकरी कर्जाच्या बोजाखाली असून उत्पन्नच नसल्यामुळे चालू हंगामापर्यंतच्या संपूर्ण कर्जाची माफी करून शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याची नितांत आवश्यकता, नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात गारपिटीसह पडलेल्या अवकाळी पावसामुळे २२ जिल्ह्यांतील सुमारे साडेचार लाख हेक्टर पेक्षा अधिक पिकांचे नुकसान होणे, अद्यापही या पंचनाम्यांचे काम पूर्ण झालेले नसणे, अवकाळी पावसामुळे मागील हंगामात काढून ठेवलेल्या पिकांचीही नासधूस झाली असून पंचनाम्यात याचाही समावेश करण्याची आवश्यकता, मिचौंग चक्रीवादळाच्या दुष्परिणामांमुळे राज्यातील पिकांचेही नुकसान होणे, अवकाळी पावसामुळे पिकांवर

बुरशीजन्य व कीड रोगाची लागण होणे, याबाबतच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता, राज्यातील बहुतांश विभागातील पाणीसाठ्याने निचांकी पातळी गाठलेली असणे, त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागणे, अस्मानी व सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट हेक्टरी ५० हजार रूपये, बागायती शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रूपये आर्थिक मदत देण्याची, दावणीला चारा व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची आवश्यकता, या सर्व प्रकरणांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. रणधीर सावरकर, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री बबनराव शिंदे, नारायण कुचे, चिमणराव पाटील, प्रकाश सोळंके, प्रशांत बंब, ज्ञानराज चौगुले, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड. आशिष शेलार, डॉ. संजय रायमूलकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री रमेश बोरनारे, दिलीप मोहिते, हरिभाऊ बागडे, सुहास कांदे, बाबासाहेब पाटील, बबनराव लोणीकर, ॲड.शहाजीबापू पाटील, सर्वश्री बाळासाहेब आजबे, प्रकाश भारसाकळे, किशोर पाटील, राजू कारेमोरे, संभाजी निलंगेकर-पाटील, नरेंद्र भोंडेकर, मनोहर चंद्रिकापुरे, डॉ. विनय कोरे, सर्वश्री किशोर जोरगेवार, चंद्रकांत नवघरे, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, नितीन पवार, डॉ. संजय कुटे, सौ. मंजुळा गावित, सर्वश्री सुनिल शेळके, जयकुमार रावल, बच्चू कडू, निलेश लंके, राणाजगजितसिंह पाटील, अनिल बाबर, आशुतोष काळे, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, मदन येरावार, महेश शिंदे, प्रा.डॉ. अशोक उईके, सर्वश्री भरतशेट गोगावले, कृष्णा खोपडे, संतोष बांगर, काशिराम पावरा, श्रीमती लताबाई सोनावणे, सर्वश्री विकास कुंभारे, महेंद्र दळवी, गणपत गायकवाड, महेंद्र थोरवे, संजय सावकारे, संजय शिरसाट, जयकुमार गोरे, श्रीनिवास वनगा, ॲड॰ राहूल कुल, श्री. शांताराम मोरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री संजय गायकवाड, समीर मेघे, बालाजी कल्याणकर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्रीमती सीमा हिरे, मोनिका राजळे, सर्वश्री हरिष पिंपळे, मोहन मते, विजय रहांगडाले, कृष्णा गजबे, समीर कुणावार, किर्तीकुमार भांगडीया, डॉ. देवराव होळी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री संजिवरेड्डी बोदकुरवार, दादाराव केचे, ॲड॰ आकाश फुंडकर, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री तानाजी मुटकुळे, संतोष दानवे, सर्वश्री भिमराव तापकीर, महेश लांडगे, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री धनंजय गाडगीळ, सुरेश भोळे, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्वेता महाले, नमिता मुंदडा, सर्वश्री राम सातपुते, राजेश पाडवी, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, टेकचंद सावरकर, नामदेव ससाणे, भिमराव केराम, राजेश पवार, दिलीप बोरसे, रविशेठ पाटील, सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, अभिमन्यू पवार, सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, श्रीमती अश्विनी जगताप, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यात ज्या शेतकऱ्यांनी सन २०१९ नंतर शेतीचे नवीन खाते उघडले आहे त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचा लाभ मिळत नसणे, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पेरण्यांची चिंता सतावत असताना काढणी झालेल्या खरीपांच्या पिकांना योग्य भाव मिळेल की नाही अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत असणे, राज्यात कापूस, सोयाबीन, तूर, धान, कांदा, केळी, संत्रा या पिकांचे नासाडी झाली असणे, सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा खाली गेल्याचे निदर्शनास येणे, केंद्र सरकारने कांद्याची किमान निर्यातमूल्य (एमईपी) थेट ८०० डॉलर प्रतिटन करण्याचा निर्णय घेतल्याने कांदा निर्यातीला खिळ बसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत केली असणे, एनडीआरएफ निकषाप्रमाणे केंद्र सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून उर्वरित सर्व तालुक्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असणे, जे नुकसान झाले आहे त्यासह शेतकऱ्यांच्या यापुर्वीच्या देखील सर्व नुकसानीची भरपाई देण्यास सरकार कटीबध्द असणे, पैनगंगा ते वैनगंगा जोडणी प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, शासनाने केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या १२०० मंडळांना दुष्काळसदृश जाहिर केले असणे, तसेच २० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात २५ टक्के अग्रीम राशी जमा करणे, राज्यात हळद उत्पादनात वाढ होत असल्याने हळद निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, आदर्श गाव योजनेत निवड झालेल्या गावांना दिल्या जाणाऱ्या निधीत हेक्टरी १० हजार रुपयांची वाढ होणे, लोकसहभाग आणि जलसंधारणाच्या कामातून राज्यात व देशात ओळख निर्माण करणाऱ्या आदर्श गाव राळेगणसिध्दी व हिवरे बाजार गावांच्या धर्तीवर राज्यातील अन्य गावांचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती गठीत करणे, दुष्काळी भागातील गावे, गावकऱ्यांचा एकोपा व लोकसहभाग अधिक असलेल्या गावात जलसंधारण ग्रामविकासाची कामे करताना सप्तसूत्रीनुसार अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असणे, रब्बी हंगामासंबंधी फळ पिक विमा योजनेत सहभागाबाबत कार्यवाही सुरु असणे, केळी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतून शेतकरी विमा संरक्षण देण्यात येणे, पिक विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडून सातबारा उताऱ्यावर २०२३-२४ संबंधी केळी पिकांची नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्रावर केळी लागवड केली आहे अशी घोषणा केल्यास त्याला पिक विमा योजनेत सहभागी करुन घ्यावे म्हणून शासनाकडून बँकांना निदेश देणे, विदर्भातील कृषी क्षेत्राचा फायदा व्हावा याकरिता कृषी महाविद्यालयाच्या जागेवर शासनाकडून कृषी तज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याचा शासनाचा मानस असणे, अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ जुलै, २०२३ ते दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ७२० आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २०१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** : (क) **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली** यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) **डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला** यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभा सदस्य अनुपस्थितीबाबतचा प्रस्ताव.**

**चार : सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)**

(१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग

(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**(चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता)**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सुनील केदार, अमीन पटेल, संजय जगताप व नाना पटोले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सहा : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**ॲड. आशिष शेलार, श्री. भरतशेट गोगावले, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री शिवेंद्रसिंह भोसले, प्रताप सरनाईक, ॲड. माणिकराव कोकाटे, ॲड. राहुल कुल, सर्वश्री संजय शिरसाट, किशोर पाटील, अतुल बेनके, नितेश राणे, डॉ. संजय रायमूलकर, सर्वश्री सुनिल शेळके, रणधीर सावरकर, प्रकाश आबिटकर, चेतन तुपे, बबनराव लोणीकर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री प्रकाश सोळंके, संतोष दानवे, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री बाळासाहेब आजबे, सुभाष देशमुख, संजय गायकवाड, यशवंत माने, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री रमेश बोरनारे, दिपक चव्हाण, राणाजगजितसिंह पाटील, सुहास कांदे, दौलत दरोडा, संभाजी निलंगेकर-पाटील, महेश शिंदे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री, हरिभाऊ बागडे, चंद्रकांत पाटील, बाबासाहेब पाटील, बच्चू कडू, जयकुमार गोरे, दिलीप लांडे, भिमराव तापकीर, योगेश कदम, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मोनिका राजळे, श्वेता महाले, श्री. राजेश पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री महेश लांडगे, अमित साटम, सिध्दार्थ शिरोळे, राम कदम, मंगेश चव्हाण, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, ॲड. लक्ष्मण पवार, सौ. सीमा हिरे, सर्वश्री राम सातपुते, जयकुमार रावल, डॉ. संजय कुटे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, देवयानी फरांदे, सर्वश्री समाधान अवताडे, कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल ढिकले, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

" राज्यात गत तीन महिने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मुद्दा आंदोलने, मोर्चे, अन्न सत्याग्रह इत्यादी माध्यमातून ऐरणीवर आला असणे, काही समाजकंटकांकडून आरक्षण मिळण्याकरिता जाळपोळ, दंगल इत्यादी माध्यमांचा वापर झाल्याचे निदर्शनास येणे, त्यापैकी काही गट मराठा समाजाचा ओबीसीत समावेश न करता स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करीत असणे, तर काही गट मराठा समाजाला कुणबी ओबीसींचे दाखले द्यावेत म्हणून आग्रही असणे, यासोबतच राज्यातील ओबीसी जनमोर्चा, धनगर, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, बंजारा, मुस्लिम इत्यादी समाजही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे आल्याची बाब निदर्शनास येणे, कोळी व महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत व तसे दाखले देण्याबाबत होत असलेली मागणी, महायुती शासनाच्या काळात मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण परत मिळावे ही मराठा समाजाची अपेक्षा असणे, यासाठी क्युरेटिव्ह याचिकाही दाखल करण्यात आली असणे, न्यायमूर्ती भोसले समितीने सुचविलेल्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असणे, मराठा आरक्षण प्रश्नी सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तीन निवृत्त न्यायमूर्तीची समिती शासनाने गठीत केलेली असणे, इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका असणे, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची

प्रभावी अंमलबजावणी करून बारा बलुतेदारांना लाभ मिळवून देण्याचे शासनाचे धोरण असणे, राज्यातील बारा जातींचा ओबीसी म्हणून महाराष्ट्राच्या सुचित समावेश असणे, त्याच धर्तीवर केंद्राच्या सुचित समावेश करण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठविण्यात आला असणे, मराठा समाजाचा इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु असणे, निजामकालीन कुणबी समाजाच्या नोंदी तपासण्याचे काम युध्दपातळीवर सुरु असणे, सारथी, बार्टी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ व महाज्योतीप्रमाणे इतर मागासवर्गाच्या ओबीसी महामंडळाला समान निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडून लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चाविमर्शाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी शासन कटिबध्द असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री.अस्लम शेख, वि.स.स.**

"छत्रपती संभाजीनगर येथील सलीम अली सरोवराकडे जाणाऱ्या ड्रेनेज लाइनचे काम करताना तीन मजूरांचा विषारी वायूमुळे झालेला मृत्यू" या विषयावरील श्री. संतोष दानवे, वि.स.स. यांचा दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक ६७२१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची दुरवस्था झालेबाबत" या विषयावरील श्री.रईस शेख, वि.स.स. यांचा दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १८५ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ५८८७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ डिसेंबर, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा